**MHTH130060962019**

दाखल दिनांक : २८/११/२०१९
नोंदणी दिनांक : २८/११/२०१९
निकाल दिनांक : ०७/१०/२०२३
कालावधी : ०३ व. १० म. ०९ दि.

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क.५, उल्हासनगर यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी : बी.ए. नेरलीकर)**

**: न्यायनिर्णय :**
**(आज दिनांक ०७ ऑक्टोंबर २०२३ रोजी घोषित केला.)**

**नि.फौजदारी खटला क.: १७७५/२०१९.**
**निशाणी क. : ३२**

| | |
|---|---|
| | प्रथम खबरी अहवाल I-२२८/२०१८ नियमित फौजदारी खटला क.: १७७५/२०१९, भारतीय दंड विधान संहितेचे कलम ३२४, ३२३, ५०४, सह कलम ३४ अंबरनाथ पश्चिम पोलिस ठाणे |
| फिर्यादी | महाराष्ट् सरकार |
| | व्दारा पोलीस अधिकारी |
| | अंबरनाथ पश्चिम पोलिस ठाणे |
| अभियोगपक्षातर्फे वकील : | श्री. पी के. धांडे |
| आरोपी | सुमीत रविंद्र गायकर<br>वय-२४ वर्षे, धंदा-नोकरी<br>रा-रुम नं. २०५, सी विंग, पनवेलकर कॉम्प्लेक्स, कोहोजगांव, ता.अंबरनाथ, जि-ठाणे. |
| आरोपीतर्फे | श्री एम.ए.डेरे वकील |

## नमुना ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | ०३/०९/२०१८ |
| प्रथम खबरी अहवाल दिनांक | ०३/०९/२०१८ |
| दोषारोप पत्र दाखल दिनांक | २८/११/२०१९ |
| दोषारोप दिनांक | २८/११/२०१९ |
| पुरावा दिल्याची तारीख | ०९/०८/२०२३ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०७/१०/२०२३ |
| शिक्षा ठोठावल्याचा दिनांक | निरंक |

## नमुना क

| अ.क्र. | आरोपींची नावे | अटक तारीख | आरोपीस जामिनावर मुक्त केल्याचा दिनांक | कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा | फौ. प्र. संहिता कलम ४२८ अन्वये किती दिवस तुरुंगा मधे राहिले होते. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सुमीत रविंद्र गायकर | ०३/०९/२०१८ | ०४/०९/२०१८ | भारतीय दंड विधान संहितेचे कलम ३२४, ३२३, ५०४, सह कलम ३४ अन्वये | निर्दोष | अंतीम आदेशा प्रमाणे | निरंक |

## नमुना-ड

**सरकारी साक्षीदार/बचावपक्षाचेसाक्षीदार/न्यायालयाचे साक्षीदार यांची यादी**

### अ- सरकारी साक्षीदार

| अ.क्र | नांव | निशाणी क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १. | संजीत राजाराम यादव | २१ | फिर्यादी |
| २. | इंद्रजीत गजाधर गुप्ता | २४ | साक्षीदार |
| ३. | अमरजीत गजाधर गुप्ता | २५ | साक्षीदार |

### ब- बचावपक्ष साक्षीदार

| अ.क्र | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

### क-न्यायालय साक्षीदार

| अ.क्र | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**सरकारी साक्षीदार/बचावाचे साक्षीदार/न्यायालयाचे साक्षीदार यांची निशाणी**

### अ- सरकारी

| अ.क्र | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | २२ | फिर्याद |
| २. | २३ | प्रथम खबरी अहवाल |

### ब- बचावपक्ष

| अ.क्र | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | २६ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | २७ ते ३० | वैदयकिय प्रमाणपत्र |

**क–न्यायालय**

| अ.क्र | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड– जप्त मुद्देमाल**

| अ.क्र | निशाणी क्रमांक | आर्टिकल | वर्णन |
|---|---|---|---|
| निरंक | निरंक | | निरंक |

**: न्यायनिर्णय :**

**(आज दिनांक ०७ ऑक्टोंबर, २०२३ घोषित केला.)**

उपरोक्त आरोपीविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम (यापुढे थोडक्यात भा.दं.सं.) ३२४, ३२३, ५०४ सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेऊन खटला चालविण्यात आला.

२) **अभियोगपक्षाची थोडक्यात हकीकत पुढीलप्रमाणे :–**

दिनांक ०३/०९/२०१८ रोजी सायंकाळी ०७.४५ वाजताचे दरम्यान वाधवा बिल्डींग, डेझी गार्डनजवळ, अंबरनाथ पश्चिम येथे फिर्यादी संजित, इंद्रजित, व अमरजीत असे दहीहंडीचे सामान घेण्याकरिता स्टेशननाका परिसरात आले असताना सुमित गायकवाड व त्याचा मित्र प्रभुराज गोकापाय व त्याचे दोन मित्रांनी इंद्रजितशी झालेल्या जुन्या भांडणाचा राग मनात धरुन त्यांना शिवीगाळ करुन आरोपी सुमित याने कैचीसारख्या टोकदार वस्तुने इंद्रजित यास पोटाचे डावे बाजुस मारहाण केली व विधिसंघर्षित बालक प्रभुराज याने लाकडी बांबुने अमरजीत याचे डोक्यावर व फिर्यादीचे डाव्या पायाचे नडगीवर मारुन लाथाबुक्यांनी मारहाण केली. म्हणुन फिर्यादीने आरोपीं विरुद्ध अंबरनाथ पश्चिम पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

३) फिर्यादीवरुन पोलिसांनी गुन्हा क्र. I २२८/२०१८ भारतीय दंड विधान संहितेचे कलम ३२४, ३२३, ५०४ सह कलम ३४ अन्वये नोंदवला. गुन्हयाचा तपास पोलीस नाईक श्री. के. एस.पाटील यांनी केला. तपासा दरम्यान त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला व साक्षीदारांचे जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले. तपासाअंती आरोपींविरुध्द पुरेसा पुरावा आल्याने त्यांच्याविरुध्द दोषारोपपत्र सादर केले.

४) मी आरोपीवर भारतीय दंड विधान संहितेचे कलम ३२४, ३२३, ५०४ सह कलम ३४ प्रमाणे निशाणी क्र. १७ वर दोषारोप निश्चित केला. आरोपीने निशाणी क्र. १८ अन्वये नाकबूल केला व खटल्यास सामोरे जाण्याची तयारी दर्शीविली.

५) अभियोगपक्षाने एकुण तीन साक्षीदार तपासले. आरोपी विरुध्द सकृतदर्शनी पुरावा न आल्याने त्यांचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये जबाब नोंदविण्यात आला नाही.

६) दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत खटल्याच्या न्यायीक निकालासाठी उद्भवलेले मुद्दे, त्यावरील माझे निष्कर्ष व निष्कर्षामागील कारणे खालील प्रमाणे आहेत.

| अ.कं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले काय की दिनांक <u>०३/०९/२०१८</u> रोजी सायंकाळी ०७.४५ वाजताचे दरम्यान वाधवा बिल्डींग, डेझी गार्डनजवळ, अंबरनाथ पश्चिम येथे आरोपीने विधिसंघर्षित बालक सोबत आपसांत संगनमत करुन आरोपी याने फिर्यादीस कैची सारख्या टोकदार वस्तुने व पायाचे नडगीवर मारहाण केली आणि विधिसंघर्षित बालक याने लाकडी बांबुने साक्षीदार अमरजीत याचे डोक्यावर मारहाण केली आणि त्याप्रमाणे भा.द.वि. कलम ३२४ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला? | ... नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| २. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले काय की वरील स्थळ, काळ व वेळेप्रमाणे आरोपीने विधिसंघर्षित बालक सोबत आपसांत संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदारांस ठोश्याबुक्याने मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली व त्याप्रमाणे भा. दं. वि. कलम ३२३ सह कलम ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र गुन्हा केला? | ... नकारार्थी |
| ३. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, वरील स्थळ, काळ व वेळेप्रमाणे आरोपीने विधिसंघर्षित बालक सोबत आपसांत संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदारांस शिवीगाळ करुन त्यांस सार्वजनिक शांतता भंग करण्यास प्रवृत्त केले आणि त्याप्रमाणे भा.द.वि. कलम ५०४ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला? | ... नकारार्थी |
| ४. | काय आदेश ? | आरोपींची निर्दोष मुक्तता. |

## -: का र ण मि मां सा :-

**मुद्दा क.०१ ते ३ बाबत :-**

७) वरील मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्यांचा एकत्रित विचार करण्यात आला आहे.

८) दिनांक ०३/०९/२०१८ रोजी सायंकाळी ०७.४५ वाजताचे दरम्यान वाधवा बिल्डींग, डेझी गार्डनजवळ, अंबरनाथ पश्चिम येथे आरोपी याने विधिसंघर्षित बालक सोबत आपसांत संगनमत करुन फिर्यादीस कैची सारख्या टोकदार वस्तुने व लाकडी बांबुने पायाचे नडगीवर व विधिसंघर्षित बालक याने लाकडी बांबुने साक्षीदार अमरजीत याचे डोक्यावर मारहाण केली. यासाठी अभियोगपक्षाने अभिलेखावर आणलेल्या पुराव्याचे विस्तृत विवेचन करणे आवश्यक आहे.

९) अभियोगपक्षाने तपासलेला साक्षीदार क्र.१ (फिर्यादी) संजीत राजाराम यादव यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, सन २०१८ साली

ते व त्यांचे मित्र नामे इंद्रजित आणि अमरजीत दही हंडीच्या निमित्ताने देसी गार्डन अंबरनाथ पश्चिम येथे रात्री साडेसात ते आठच्या दरम्यान गेले होते. दही हंडी पाहत असताना तेथे अचानक पळापळ झाली व ते सुद्धा पळाले असता ते पडले आणि त्यात त्यांच्या पाठीला आणि पायाला मार लागला. त्यांना कोणीही मारले नव्हते. तसेच साक्षीदरम्यान त्यांना नि.क्र.२२ व २३ वरील तक्रार व प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला असता त्यांनी फिर्यादिवरील सही मान्य केली परंतु त्यामधील मजकूर त्यांना माहिती नाही असे कथन केले आहे. त्यांच्या उलटतपासात त्यांनी त्यांचा व आरोपींचा आपसी समझोता झाला आहे हे कथन करुन उलटतपासात विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे नकारात्मक दिली आहे.

१०) अभियोगपक्षाने तपासलेला साक्षीदार क्र.२ (साक्षीदार) इंद्रजीत गजाधर गुप्ता यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, दिनांक ०३/०९/२०१८ रोजी दही हंडी होती ते, संजीत आणि अमरजीत हे दही हंडी पाहण्याकरिता वाधवा बिल्डींग येथे गेले होते. दही हंडी पाहत असताना तेथे अचानक पळापळ झाली व ते सुद्धा पळाले असता ते तेथे पडले आणि त्यात त्यांच्या पोटाला मार लागला. त्यांना कोणीही मारले नव्हते. त्यांच्या उलटतपासात त्यांनी त्यांचा व आरोपींचा आपसी समझोता झाला आहे हे कथन करुन उलटतपासात विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे नकारात्मक दिली आहे.

११) अभियोगपक्षाने तपासलेला साक्षीदार क्र.३ (साक्षीदार) अमरजीत गजाधर गुप्ता यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, घटना दही हंडीच्या दिवशी घडली होती. त्या दिवशी ते, संजीत आणि इंद्रजीत हे दही हंडी पाहण्याकरिता वाधवा बिल्डींग येथे गेले होते. दही हंडी पाहत असताना तेथे अचानक पळापळ झाली व ते सुद्धा पळाले असता ते तेथे पडले आणि त्यात त्यांच्या डोक्याला मार लागला. त्यांना कोणीही मारले नव्हते. त्यांच्या उलटतपासात त्यांनी त्यांचा व आरोपींचा आपसी समझोता झाला आहे हे कथन करुन उलटतपासात विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे नकारात्मक दिली आहे.

१२) अभिलेखावर आलेल्या फिर्यादीच्या पुराव्याचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, फिर्यादीने त्यांचे फिर्यादमधील मजकूर माहिती नाही असे कथन केले आहे. फिर्यादी व त्यांचे मित्र दही हंडी पाहण्याकरिता वाधवा बिल्डींग येथे गेले होते तेथे अचानक पळापळ झाली व ते सर्वजण सुद्धा पळाले होते व ते तिघेही पडले व त्यात फिर्यादीच्या पाठीला आणि पायाला आणि साक्षीदारांच्या डोक्याला व पोटाला मार लागला होता. त्यांना कोणीही मारले नव्हते असे कथन करुन फिर्यादीने फिर्याद व प्रथम खबरी अहवाल यावरील सही मान्य केली परंतु त्यामधील मजकुराबाबात माहित नाही असे कथन केले. तसेच त्यांच्या उलटतपासात त्यांनी त्यांचा व आरोपींचा आपसी समझोता झाला असुन त्यांना पुढील साक्षीदार तपासायचे नाही असे कथन केले आहे व त्यासंदर्भात नि.२० वर सुचना पत्र दाखल केलेले आहे. तपासण्यात आलेल्या सर्व साक्षीदारांनी अभियोग पक्षास मदत होईल असे भाष्य केले नसल्याचे दिसून येते. तसेच आरोपीच्या वकीलांनी घटनास्थळ पंचनामा निशाणी क्र. २६ व वैदयकिय प्रमाणपत्र निशाणी क्र. २७ ते ३१ जरी मान्य केले तरी फिर्यादी व साक्षीदाराला झालेल्या जखमा हया आरोपींनीं केलेल्या मारहाणीमुळे झाल्यात हे कोठेही सिद्ध होत नाही. त्यामुळे अभियोगपक्षाचा पुरावा निशाणी क्र. ०१ वर आदेश पारीत करुन बंद करण्यात आला. एकंदरित अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता, आरोपींना या गुन्हयात गोवण्यासाठी कोणताही सबळ पुरावा पटलावर आलेला नाही. म्हणून मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क.०४ करीता :-</u>**

१३) उपरोक्त कारणमिमांसेवरुन हे स्पष्ट होते की, अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द ठेवलेला दोषारोप सशंयापालिकडे शाबीत केला नाही. त्यामुळे आरोपीला निर्दोष मुक्त करणे न्यायोचित ठरेल. म्हणून मुद्दा क्र. ४ च्या अनुषंगाने खालील आदेश देण्यात येत आहे.

. **<u>-: आ दे श :-</u>**

१) आरोपी सुमीत रविंद्र गायकर यांची भारतीय दंड विधान संहितेचे कलम ३२४, ३२३, ५०४ सह कलम ३४ अन्वये वरील आरोपातून

फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२) आरोपीचे बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३) फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७-अ चे पुर्ततेसाठी आरोपींस रुपये ५०००/- प्रत्येकी चे वैयक्तिक बंधपत्र देण्याचे निर्देश देण्यात येतात.

४) न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर केला.

**सही/-**

**ठिकाण: उल्हासनगर.**

**दिनांक: ०७/१०/२०२३.**

**(बी. ए. नेरलीकर),**
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,**
**(न्यायालय क्र.५), उल्हासनगर.**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Mrs. S. R.Khan |
| Name of Court | :- | Mr. B.A.Nerlikar<br>5th Jt. Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Ulhasnagar, Dist-Thane |
| Date of decision / typed | :- | 07.10.2023 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 07.10.2023 |
| Judgment/order uploaded on | :- | 07.10.2023 |